॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/ १६७ परिपत्रक दिनांक : १४/११/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये, व
विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 'जनजातीय गौरव दिन' व 'जनजातीय गौरव सेवा सप्ताह' विविध उपक्रमाने साजरा करण्याबाबत**

.संदर्भ:**१.) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१६४/ जपुक(२१), दिनांक ०३ नोव्हेंबर २०२६.**
२. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोबर २०२५.
३. कार्यालय, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट यांचे पत्र क्र. ३६७५, दिनांक १३ नोव्हेंबर २०२६.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी 'जनजातीय गौरव दिन' साजरा करण्यात येणार आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा यांचे त्याग, संघर्ष व समाजसुधारणेचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी असल्याने दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'जनजातीय गौरव सेवा सप्ताह' साजरा करण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने दिले आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठीय शैक्षणिक संकुलांनी दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक, सामाजिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून 'जनजातीय गौरव दिन' उत्साहात साजरा करावा. तसेच दिनांक ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'जनजातीय गौरव सेवा सप्ताह' अंतर्गत पुढीलप्रमाणे उपक्रमांचे आयोजन करावे.

१. भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर व्याख्याने, परिसंवाद व चर्चासत्रांचे आयोजन करणे.
२. आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, त्याग, संघर्ष व सांस्कृतिक वारसा याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे.
३. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासंदर्भात जनजागृतीपर उपक्रम राबविणे.
४. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा व पोस्टर स्पर्धांचे आयोजन करणे.
५. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन व जनजागृतीपर उपक्रम राबविणे.
६. आयोजित कार्यक्रमांची माहिती व छायाचित्रे सामाजिक माध्यमांवर (Social Media) प्रसारित करून व्यापक प्रसिद्धी देणे.

वरील सर्व उपक्रमांचे आयोजन सोबत जोडलेल्या शासनाच्या निर्देशानुसार करून आयोजित कार्यक्रमांचा अहवाल व छायाचित्रे विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण यांचे मार्फत संचालनालयास सादर करुन सदर बाब अत्यंत तातडीची व महत्त्वाची असल्याने आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करुन संक्षिप्त अहवाल विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या nss@srtmun.ac.in इमेलवर सादर करावा.

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र–कुलगुरु महोदयांचे कार्यालय,प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९ : director.dhepune@nic.in

क्र.उशिसं/मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोंबर २०२५

परिपत्रक

विषय : भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त "जनजाती गौरव दिन" राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तसेच कार्यकक्षेतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन **"जनजाती गौरव दिन"** उत्साहात साजरा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत संचालनालयास अहवाल सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय, अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव सादर.

कार्यालय,प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट जि. नांदेड
रोड गोकुंदा ता. किनवटजि. नांदेड
दुरध्वनी व फॅक्स क्र:०२४६९-२२२०१५
Email- poitdp.kinwat-mh@gov.in

जा.क्र./शाआशा.शिक्षण/प्र.क्र./का-१०(२)/ 3675 /२०२६/ दिनांक:- १३ /११/२०२६

प्रति,

मा. कुलगुरु,
स्वामी रामानंद तिर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विषय:- क्रांतिसुर्य भगवान बिरसा मुंडा जयंती जनजातीय गौरव दिन व जनजातीय गौरव सेवा सप्ताह साजरा करणे बाबत.

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण, -२०२६/प्र.क्र.१६४/जपुक(२९), दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार भगवान बिरसा मुंडा यांचे जयंतीनिमीत्त १५ नोव्हेंबर, २०२६ रोजी जनजातीय गौरव दिन म्हणुन साजरा केला जातो.

क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांचा त्याग, संघर्ष व समाजसुधारणांचे कार्य महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरावे या उद्देशाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ ते १८ नोव्हेंबर,२०२६ या कालावधीत जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह-२०२६ संपुर्ण राज्यात साजरा करणेबाबत वरील संदर्भिय शासन परिपत्रक नुसार निर्देश प्राप्त आहेत.

संदर्भिय शासन परिपत्रक नुसार दिनांक १७ नोव्हेंबर, २०२६ रोजी विद्यापीठांच्या कुलगुरु यांचे मार्फत विद्यापीठ स्तरावरील अध्यासन केंद्रांवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे बाबत शासन निर्देश आहेत.

तरी आपले अधिनस्त अध्यासन केंद्रांवर शासन निर्देशानुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे. हि नम्र विनंती.

सोबत :- संदर्भिय शासन परिपत्रक

आपला विश्वासु

13/11

बी. सरवनन (भा. प्र.से.)
सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट
ता. किनवट जि. नांदेड

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंती जनजातीय गौरव दिन म्हणून साजरी करण्याबाबत तसेच जनजातीय गौरव सेवा सप्ताह-२०२६ (दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ ते १८ नोव्हेंबर, २०२६) साजरा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१६४/जपुक(२९)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- ०३ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :- १) जनजातीय कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांची दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ रोजीची अधिसूचना.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जपुती-२०२५/प्र.क्र.१९५/कार्या-जपुक (२९), दिनांक २९ डिसेंबर, २०२५.

परिपत्रक :-

"भगवान बिरसा मुंडा" यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल-जंगल-जमीन यांच्या रक्षणासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांचा त्याग, संघर्ष आणि समाजसुधारणेचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. केंद्र शासनाने दि. १२ नोव्हेंबर, २०२१ च्या अधिसूचनेनूसार भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त १५ नोव्हेंबर "जनजातीय गौरव दिन" साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने दि.१५ नोव्हेंबर रोजी राज्यात "जनजातीय गौरव दिन" साजरा करण्यात यावा.

२. सन २०२६ मध्ये राष्ट्र पुरुष थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.२ येथील दि.२९ डिसेंबर, २०२५ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर परिपत्रकामध्ये अनु.क्र. ३९ वर भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्त दि.१५ नोव्हेंबर, २०२६ रोजी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

३. उपरोक्त पार्श्वभूमीवर क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचा त्याग, संघर्ष, समाजसुधारणांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरावे या उद्देशाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ ते १८ नोव्हेंबर, २०२६ या कालावधीतील जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह-२०२६ संपूर्ण राज्यात साजरा करण्याच्या अनुषंगाने कार्यक्रमाची रुपरेषा **परिशिष्ट अ** मध्ये जोडली आहे. तरी, त्याप्रमाणे सदर कार्यक्रमाच्या रुपरेषेची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच याबाबत समन्वयासाठी नोडल विभाग म्हणून आदिवासी विकास विभाग यांनी जबाबदारी पार पाडावी.

४. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी जिल्हा माहिती अधिकारी यांना अशा कार्यक्रमास ठळक प्रसिध्दी देण्याविषयी तसेच सामाजिक माध्यमे (Social Media) वर आवश्यक प्रचार-प्रसार च्या दृष्टिने संबंधितांना आवश्यक दिशा निर्देश द्यावेत.

६. सदर शासन परिपत्रक हे सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, इ. कार्यालयांना लागू राहिल.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६११०३१७२४०९५३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by SHINDE DATTATRAY C
Date: 2026.11.03 17:27:20 +05'30'

(दत्तात्रय शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्यांक विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (प्र.ना.उ.सु.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग - यांना विनंती करण्यात येते त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणारी शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थां इ. यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.
१०. सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहिकरिता.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१५. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
१६. निवड नस्ती (कार्यासन-२९)

पृष्ठ ६ पैकी २

परिशिष्ट "अ"

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह २०२६

कालावधी :- दिनांक ११ नोव्हेंबर ते दिनांक १८ नोव्हेंबर २०२६

कार्यक्रमाची रूपरेषा

दिनांक	कार्यक्रमाची रुपरेषा
११ नोव्हेंबर, २०२६	सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात यावे.
१२ नोव्हेंबर, २०२६	सर्व अनुसूचित जमाती (ST) बहुल तालुका मुख्यालयामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात यावे.
१३ नोव्हेंबर, २०२६	**न्यूक्लियस बजेट योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना धनादेश वितरण** ▪ आदिवासी विकास विभागाच्या न्यूक्लियस बजेट अंतर्गत निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना धनादेश वितरण. ▪ धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) योजने अंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वाटप. ▪ प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) अंतर्गत लाभार्थ्यांना लाभ वाटप. ▪ महिला बचत गटांना लाभ वाटप. ▪ लाभार्थ्यांना मंजूर योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन. ▪ स्वयंरोजगार, व्यवसाय व आर्थिक स्वावलंबनासाठी मार्गदर्शन. ▪ लाभार्थ्यांशी संवाद व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सूचना. ▪ या वर्षासाठी न्यूक्लियस बजेट अंतर्गत योजनांसाठी अर्ज स्वीकारणे ▪ कृषीपूरक व्यवसाय, शेतीसाठी आवश्यक साधने, सिंचन सुविधा व उत्पादनवाढीच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन. ▪ लाभार्थ्यांना कृषी विभाग, बँका व संबंधित यंत्रणांच्या योजनांशी जोडण्यासाठी समन्वय.
१४ नोव्हेंबर, २०२६	**स्मारकांची स्वच्छता आणि दीपोत्सव** ▪ सर्व आदिवासी स्मारके व सार्वजनिक ठिकाणी स्थापित पुतळ्यांची स्वच्छता आणि योग्य देखभाल सुनिश्चित केली जावी. ▪ तसेच सायंकाळी सर्व आदिवासी स्मारके व सार्वजनिक ठिकाणी दीपोत्सव आयोजित केला जावा. ▪ आदिवासी देव देवता, पूजा पद्धती, अस्मिता व संस्कृतीचे दर्शन घडविणारे कार्यक्रम आयोजित करणे.

पृष्ठ ६ पैकी ३

	पुरस्कार प्रदान करणे.
१५ नोव्हेंबर, २०२६	▪ **क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंती - मुख्य शासकीय कार्यक्रम** ▪ **माल्यार्पण आणि पुष्पांजली:** ▪ भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला जिल्हा स्तरावर आणि आदिवासी भागातील प्रत्येक मंडळावर त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करणे. ▪ तसेच आदिवासी समाजातील संबंधित प्रदेशातील महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण व पुष्पांजली वाहणे. ▪ सर्व जिल्हा मुख्यालयी व आदिवासी बहुल तालुका मुख्यालयी भगवान बिरसा मुंडा ह्यांच्या १५१ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे. ▪ **गडचिरोली येथे मा राज्यपाल महोदय,मा मुख्यमंत्री महोदय, मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय, मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) महोदया व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम आयोजित करणे.** ▪ १५ तारखेच्या राज्यस्तरीय,जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय कार्यक्रमांमध्ये जनजातीय विभूतींचे अभिनंदन: ▪ गेल्या १२ वर्षांत पद्म पुरस्काराने सन्मानित सर्व आदिवासी व्यक्तींचा, 'मन की बात' मध्ये उल्लेख केलेल्या आदिवासी समूहांचा, सामाजिक नायकांचा, समाजसेवकांचा, आदिवासी नायकांच्या नातेवाईकांचा, आदिवासी समाजातील बुद्धिजीवींचा, विशिष्ट व्यक्तींचा व प्रभावशाली व्यक्तींचा सत्कार व अभिनंदन करणे . ▪ तसेच आदिवासी समाजाशी जोडलेल्या संत-महंतांच्या ठिकाणी जाऊन त्यांचा सन्मान करणे . ▪ उद्याने, चौक आणि रस्त्यांना आदिवासी महापुरुषांची नावे देणे, पुतळे व स्मारकांची स्थापना करणे आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी समन्वय साधणे.
१६ नोव्हेंबर, २०२६	**आधार कार्ड व शासकीय कागदपत्रे सेवा शिबिर** ▪ अधिकृत यंत्रणेच्या सहकार्याने आधार कार्ड दुरुस्ती व अद्ययावतीकरण. ▪ वनपट्टेधारकांना विविध लाभ वाटप. ▪ विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन. ▪ पात्र लाभार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी मदत व सेवा-सुविधांची माहिती. ▪ कृषी विभागाच्या ऑनलाइन सेवा, शेतकरी नोंदणी, पीकविमा व अनुदान योजनांसाठी आवश्यक प्रक्रिया समजावून सांगणे.

	▪ डिजिटल साधनांचा वापर करून शासकीय अर्ज व सेवा मिळविण्याबाबत प्रात्यक्षिक.
१७ नोव्हेंबर, २०२६	▪ **आरोग्य व पोषण जनजागृती शिबिर** ▪ आरोग्य विभागाच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर. ▪ रक्तदाब, मधुमेह व आवश्यक प्राथमिक तपासण्या. ▪ सिकलसेल आजाराबाबत जनजागृती व आवश्यकतेनुसार तपासणीसाठी संदर्भसेवा. ▪ माता व बाल आरोग्य, पोषण आणि प्रतिबंधात्मक आरोग्याबाबत मार्गदर्शन. ▪ पोषणबाग, परसबाग व स्थानिक पिकांवर आधारित संतुलित आहाराबाबत माहिती. ▪ कृषी व आरोग्य विभागाच्या समन्वयाने पौष्टिक तृणधान्ये, कडधान्ये व स्थानिक अन्नपिकांचे महत्त्व समजावून सांगणे. ▪ **विद्यापीठांच्या कुलगुरुंमार्फत विद्यापीठ स्तरावरील अध्यासन केंद्रामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.**
१८ नोव्हेंबर, २०२६	**आदिवासी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सक्षमीकरण दिवस व सप्ताह समारोप कार्यक्रम** ▪ महिला बचत गट व स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन. ▪ पात्र लाभार्थ्यांना कृषी, पशुसंवर्धन व कौशल्य विकास योजनांची माहिती. ▪ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, जात वैधता, व्यावसायिक शिक्षण व स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन. ▪ बँक खाते, डिजिटल व्यवहार व आर्थिक साक्षरतेबाबत जनजागृती. ▪ विविध शासकीय योजनांतील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी व विभागीय समन्वय. ▪ कृषी यंत्रसामग्री, सेंद्रिय शेती, जलसंधारण, पीक विविधीकरण व बाजारपेठ जोडणीबाबत मार्गदर्शन. ▪ युवक व युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी, अप्रेंटिसशिप व स्वयंरोजगार योजनांची माहिती. ▪ कौशल्य विकास विभाग, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रशिक्षण भागीदारांच्या माध्यमातून समुपदेशन व प्राथमिक नोंदणी.

- **सप्ताहामध्ये सर्वत्र विविध उपक्रम राबविले जाण्याबाबत :-** सर्व विभागांना सूचीत करण्यात येते की, सर्व कार्यक्रमांमध्ये शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था व लोकप्रतिनिधी ह्यांचा प्रभावी आणि सक्रिय सहभाग (भूमिका) सुनिश्चित करावा.

- **जनजातीय स्वाभिमान संमेलन / मेळावे / क्रीडा स्पर्धांचे आयोजन :-** सर्व आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक परंपरा आणि गौरवशाली इतिहास प्रदर्शित करणाऱ्या शोभायात्रा, जनसभा, आदिवासी लोककला, लोकनृत्य, लोकगीते, साहित्य आणि पारंपारिक ज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक मेळाव्यांचे आयोजन करावे.

- **सोशल मीडिया आणि प्रचार मोहीम :-** भगवान बिरसा मुंडा आणि इतर आदिवासी नायकांचे जीवन व योगदान, तसेच आदरणीय प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी कल्याण व सन्मानासाठी केलेल्या ऐतिहासिक कामांवर आधारित लेख (Op-eds), व्हिडिओ, पॉडकास्ट, रिल्स आणि इतर डिजिटल साहित्याच्या माध्यमातून मीडिया व सोशल मीडियावर व्यापक प्रचार-प्रसार केला जावा.

❖ **टिप :-**

१) **सर्व पालकमंत्री महोदय यांनी जिल्हाच्या ठिकाणी दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ रोजी पत्रकार परिषद आयोजीत करावी.**

२) **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयस्तरावर व जिल्हयाच्या ठिकाणी मिरवणूका व मुख्य शासकीय कार्यक्रमास उपस्थित रहावे.**